| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप-आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**<br>**बंगला नं ६, येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | PUNE CITY TRAFFIC POLICE |

जावक क्रमांक–पोउपआ/वाह/नियो./ 2060 /२०२४ दिनांक :- २०/०३/२०२४

**प्रेसनोट**

पुणे शहरात मोठया प्रमाणात वाहनांचे संख्येमध्ये झालेली वाढ व त्या प्रमाणात रस्त्यांची न झालेली वाढ, त्यामुळे रस्त्यांवर वाहनांची वाढलेली घनता, यामुळे वाहतुक कोंडी निर्माण होवून, जड वाहनांमुळे अपघातांच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे तसेच विविध मोठे प्रकल्प (मेट्रो, उड्डाणपूल, विविध विकास कामे) सुरु असल्यामुळे रस्त्यावरील जागा मोठया प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. यामुळे नागरिकांना मोठा धोका व गैरसोय होते.

त्याकरिता जनतेस पोहचणारा धोका, अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. ०१९६/८७१/सी.आर.-३७/टी.आर.ए.-२, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, वाहतूकी संदर्भात नव्याने आदेश निर्गमित करीत आहे.

**पुणे शहरामधुन सोलापूर रोड, अहमदनगर रोड, सातारा रोड, मुंबई रोड, नाशिक रोड, सासवड रोड, पौड रोड, आळंदी रोड व इतर रस्त्यांवरून पुणे शहरामधुन मार्गक्रमण करून दुसऱ्या शहराकडे जाणारी व येणारी सर्व प्रकारची जड अवजड माल वाहतूक करणारे ट्रक व इतर वाहनांनी (अत्यावश्यक सेवेतील वाहने, पब्लीक ट्रान्सपोर्ट बसेस, इत्यादी वगळुन) येताना व जाताना खालील मार्गाचा वापर करावा, या व्यतिरीक्त पुणे शहरामधील अन्य मार्ग वापरण्यास पुर्ण वेळ बंदी आहे. याकरीता तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगिक तत्वावर खालील प्रमाणे नव्याने आदेश निर्गमीत करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.**

❖ **१) दिनांक २३/०३/२०२४ रोजी पासुन सकाळी ०८:०० ते २२:०० वा. पर्यत प्रवेश बंद असलेले मार्ग (रात्री २२.०० ते सकाळी ०८.०० वा. पर्यत प्रवेश आहे)**

१. अहमदनगर रोडवरून पिंपरी चिंचवड, मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांकरीता खराडी बायपास चौक, शास्त्रीनगर चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, होळकर पुल, पोल्ट्री फार्म चौक, हॅरिस पुल मार्ग,

➢ **पर्यायी मार्ग** :- वाहन चालकांनी शिक्रापूर, चाकण, तळेगाव मार्गे इच्छितस्थळी जावे.

२. अहमदनगर रोडवरून साताराकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांकरीता खराडी बायपास चौक, मगरपट्टा रोड, सासवड रोडने मंतरवाडी फाटा चौक, खडी मशीन चौक, कात्रज चौक मार्ग

➢ **पर्यायी मार्ग** :-वाहन चालकांनी लोणीकंद, केसनंद, थेऊर, थेऊर फाटा मार्गे इच्छितस्थळी जावे.

➢ **उपलब्ध पर्यायी मार्ग** :- वाहन चालकांनी शिरूर, नाव्हरा, केडगाव चौफुला, लोणंद किंवा सुपा, जेजूरी मार्गे इच्छितस्थळी जावे.

३. अहमदनगर रोडवरून सोलापूरकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांकरीता खराडी बायपास चौक, मगरपट्टा रोड, हडपसर मार्ग

➢ **उपलब्ध पर्यायी मार्ग** :-वाहन चालकांनी शिरूर, नाव्हरा, केडगाव चौफुला मार्गे इच्छितस्थळी जावे.

४. सोलापूर रोडवरून साताराकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांकरीता हडपसर, मंतरवाडी फाटाचौक, खडी मशीनचौक, कात्रजचौक मार्ग

➢ **उपलब्ध पर्यायी मार्ग** :- वाहन चालकांनी केडगाव चौफुला, लोणंद मार्गे इच्छितस्थळी जावे.

५. सोलापूर रोडवरून अहमदनगर व नाशिककडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांकरीता हडपसर, मगरपट्टा रोड, खराडी बायपास चौक, शास्त्रीनगर चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, होळकर पुल, पोल्ट्री फार्म चौक, हॅरिस पुल मार्ग

➢ **पर्यायी मार्ग** :- वाहन चालकांनी थेऊर फाटा, थेऊर, केसनंद, लोणीकंद, शिक्रापुर मार्गे इच्छितस्थळी जावे.

➢ **उपलब्ध पर्यायी मार्ग** :- वाहन चालकांनी केडगाव चौफुला, नाव्हरा, शिरूर मार्गे इच्छितस्थळी जावे.

पुणे शहरामधील अंतर्गत रस्त्यावर जड अवजड माल वाहतूक करणारे ट्रक, डंपर, मिक्सर, बल्कर, जे.सी.बी.,रोड रोलर वाहनांसाठी (अत्यावश्यक सेवेतील वाहने, पब्लीक ट्रान्सपोर्ट बसेस, इत्यादी वगळुन) तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगिक तत्वावर खालील प्रमाणे नव्याने आदेश निर्गमीत करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.

❖ २) (अ) <u>२४ तास प्रवेश बंद असलेले रस्ते</u>

१. **मंगलदास रोड** -ब्ल्यु डायमंड चौक ते सर्किट हाऊस चौक
२. **रेंजहिल्स् रोड** - पोल्ट्री फार्म चौक ते रेंजहिल्स् कॉर्नर चौक
३. **सर मानेकजी मेहता रोड** :- काहुन रोड जंक्शन ते कॉन्सिल हॉल चौक
४. **पुणे स्टेशन रोड** :- जहांगीर हॉस्पिटल चौक ते अलंकार सिनेमा चौक

❖ २) (ब) <u>०८:०० ते २२:०० वा. पर्यत प्रवेश बंद असलेले रस्ते</u>

१. **कोरेगाव पार्क रोड** -नॉर्थ मेन रोड ताडीगुत्ता चौक ते कोरेगाव पार्क जंक्शन

❖ २) (क) <u>०८:०० ते ११:०० व १६:०० ते २२:०० वा. पर्यंत प्रवेश बंद असलेले चौक</u>

१. **संचेतीचौक** -जंगली महाराज रोड, गणेशखिंड रोड
२. **पैाड फाटाचौक**–कर्वे रोड, डेक्कनकडे, लॉ कॉलेज रोड
३. **राजाराम पुल** -डी.पी. रोडकडे
४. **दांडेकर पुल** -शास्त्री रोडकडे
५. **सावरकर पुतळा चौक** -बाजीराव रोडकडे
६. **पॉवर हाऊसचौक** -मालधक्का चौकाकडे
७. **पोल्ट्री फार्मचौक**–आर.टी.ओ. चौकाकडे
८. **पंडोल अपार्टमेंट चौक** - महात्मा गांधी रोडकडे
९. **खाणे मारूती चौक** -इस्ट स्ट्रीटकडे
१०.**लक्ष्मी नारायण सिनेमा चौक**–जेधे चौकाकडे
११.**ब्रेमेन चौक** :- पुणे विद्यापीठ चौकाकडे
१२.**अभिमान श्री बाणेर चौक** :- पुणे विद्यापीठ चौकाकडे
१३.**अभिमान श्री पाषाण चौक** :- पुणे विद्यापीठ चौकाकडे
१४.**सिंफनी सर्कल** :- गणेशखिंड रोडकडे
१५. **सेव्हन लव चौक** - जेधे चौकाकडे
१६. **आर.टी.ओ. चौक** - शाहीर अमर शेख चौकाकडे

(रोहिदास पवार)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३ पुणे शहर.**
२. **पोलीस निरिक्षक**, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.